# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७.०४.२०२६**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (११.०४.२०२६ ते १७.०४.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१८.०४.२०२६ ते २२.०४.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | २ | ५ | १० | ९ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ४० | ४० | ३९ | ३८ | ३८ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २० | २१ | २२ | २३ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ५ | ३ | ३ | २ | २ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४७ | ५१ | ६१ | ७० | ७० |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३३ | ३४ | ३७ | ४१ | ४२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | १० | ६ | ५ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | उ.वा. | उ. | वा. | वा. | वा. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये १८, १९ व २० एप्रिल रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तसेच २१ व २२ एप्रिल रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये १८, १९, २०, २१ व २२ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये २२ एप्रिल पर्यंत कमाल तापमान ३८.० ते ४०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २०.० ते २३.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ४७ ते ७०% या दरम्यान, दुपारची सापेक्ष आद्रता ३३ ते ४२% या दरम्यान राहण्याची तसेच वाऱ्याचा वेग ताशी ४ ते  किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २२ ते २८ एप्रिल दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | ➢ **१७ एप्रिल रोजी** सातारा जिल्हा मध्ये काही ठिकाणी **उष्णतेची लाट येण्याची** शक्यता आहे.<br>➢ **१९ एप्रिल रोजी** सातारा जिल्हा तसेच घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, व ताशी ४०-५० किमी वेगाच्या वाऱ्यासह **मध्यम पावसाची** शक्यता आहे.<br>➢ **२० एप्रिल रोजी** सातारा जिल्हा तसेच घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, व ताशी ३०-४० किमी वेगाच्या वाऱ्यासह **हलक्या ते मध्यम पावसाची** शक्यता आहे.<br>➢ **२१ एप्रिल रोजी** सातारा जिल्हा मध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, व ताशी ३०-४० किमी वेगाच्या वाऱ्यासह **हलक्या ते मध्यम पावसाची** शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ **शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ मेघ गर्जना, विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/बांबू च्या सहय्याने आधार द्यावा.<br>➢ शेतामध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव, नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्यांना त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टिकच्या शीटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>➢ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये.<br>➢ **किटकनाशक तसेच बुरशीनाशकाची फवारणी पावसाची उघडिप पाहून व वारा शांत असताना करावी** |
| संदेश | | शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" तर विजांच्या अंदाजासाठी "दामिनी" हे अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करून वापरावे. |
| मका | वाढीची | ➢ उष्ण हवामानामुळे बाष्पोत्सर्जन वाढून पिकावर पाण्यचा ताण येऊ शकतो. त्यामुळे पिकाला पाण्याचा ताण येऊ देऊ नये<br>➢ जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी विशेषत: सकाळी किंवा संध्याकाळी हलके पाणी द्यावे |
| सुर्यफुल | पक्वता | ➢ पक्व झालेल्या सुर्यफुल पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| टोमॅटो | वाढीची | ➢ तुरळक ठिकाणी जोरदार वाऱ्यासाह हलक्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो रोपांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ उष्ण हवामानामुळे बाष्पोत्सर्जन वाढते, परिणामी पिकावर ताण येऊन वाढ व उत्पादनावर परिणाम होतो त्यामुळे जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी हलके व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे<br>➢ बाष्पीभवन कमी करण्यासाठी आच्छादन (मल्चिंग) करावे |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| मिरची | फळ वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्याने काही ठिकाणी कोळी किडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फेनप्रोपॅथ्रीन ३०% ईसी ५ मिली किंवा फेनॅक्झाक्विन १० ई.सी. २५ मिली प्रती १० लीटर पाण्यातून फवारणी करावी. |
| केळी | वाढीची | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या/ काढणीस आलेल्या घडांची काढणी करावी व काढणी केलेले घड सुरक्षित ठिकाणी ठेवावेत<br>➢ पाऊस व जोरदार वाऱ्याने केळी झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून फळझाडांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| पशुधन | वाढीची | जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ शक्य असल्यास गोठ्यांमध्ये फॅन लावावेत<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त व हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्रीमधील पक्षांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पोल्ट्रीच्या बाजूने बारदाणे लावावेत व त्यावर वारंवार पाणी शिंपडावे जेणेकरून आतील तापमान कमी राहण्यास मदत होईल.तसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी . |

| | |
|---|---|
| मेघदूत<br>अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी<br>अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १७.०४.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर